३ वृत्तमानस
मुंबई
मुंबई, गुरुवार, १४ ऑगस्ट २०२५

## मुंबई-गोवा महामार्गासाठी राज्यस्तरीय समिती

**मुंबई :** मुंबई-गोवा महामार्गाची कामे गणेशोत्सव सणाच्या पार्श्वभूमीवर तातडीने पूर्ण करावीत. महामार्गावरील इंदापूर - माणगाव नजीकच्या रस्त्यासाठी लागणाऱ्या २१ कोटींचा निधी उपलब्ध करणार असून, ही कामे तातडीने पूर्ण करावीत. मुंबई-गोवा महामार्गावरील अपुरी कामे पूर्ण करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय समिती नेमून कामे मिशन मोडवर पूर्ण करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले. मंत्रालयात मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाविषयी आयोजित बैठकीत उपमुख्यमंत्री अजित पवार बोलत होते. यावेळी सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, खासदार सुनिल तटकरे, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता, नियोजन विभागाचे सचिव डॉ.राजगोपाल देवरा यावेळी उपस्थित होते.

### शांतता व उत्साहपूर्ण वातावरणात गणेशोत्सव साजरा करावा

# सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी 'ऑपरेशन सिंदूर' आणि 'स्वदेशी' विषयी जनजागृती करावी - मुख्यमंत्री

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी यावर्षीच्या गणेशोत्सवामध्ये भारताने जगाला ऑपरेशन सिंदूरद्वारे दाखविलेली शक्ती आणि स्वदेशी वस्तूंच्या वापराविषयी जनजागृती करावी. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी प्रशासनासोबत समन्वय ठेवून हा गणेशोत्सव शांतता व उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करावा, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी करीत ' ऑपरेशन सिंदूर' वर आधारित देखावे हे जवानांसाठी समर्पित असण्याची अपेक्षाही व्यक्त केली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गणेशोत्सवा दरम्यान गणेश भक्तांना कुठल्याही प्रकारे अडचणी

### गणेशोत्सव निमित्त कायदा व सुव्यवस्था बैठक

येणार नाहीत, त्यापद्धतीने कार्यवाही करण्याच्या सूचनाही प्रशासनाला दिल्या. सार्वजनिक गणेशोत्सव निमित्त कायदा व सुव्यवस्था बैठकीचे आयोजन सह्याद्री अतिथी गृह येथे करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री आढावा घेताना बोलत होते. बैठकीस उपमुख्यमंत्री अजित पवार, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, गृह (ग्रामीण) राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, गृह (शहरे) राज्यमंत्री योगेश कदम, मुख्य सचिव राजेश कुमार उपस्थित होते.

सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाप्रमाणे मूर्तीकरांनाही सलग पाच वर्ष परवानगी देण्याचे निर्देश देत मुख्यमंत्री म्हणाले, मूर्तीकारांनी या परवान्यांचे दरवर्षी नूतनीकरण करावे. परवानगीसाठी महापालिके मार्फत सुरू करण्यात आलेल्या संगणकीय प्रणालीवर आधारित एक खिडकी योजनेचा लाभ घेण्यात यावा. गणेश मूर्तींचे विसर्जन करण्यासाठी कृत्रिम तलावांची संख्या आणि उंच मूर्तींचे खोल समुद्रात विसर्जनासाठी बोटींची संख्याही समुद्रकिनारी वाढविण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

मुख्यमंत्री म्हणाले, गणेशोत्सवाला राज्य शासनाने राज्य महोत्सवाचा दर्जा दिला आहे. त्यामुळे राज्य शासनातर्फे हा महोत्सव साजरा करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर विस्तृत नियोजन करण्यात आले आहे. गणेशोत्सव मंडळांना मागील वर्षी दिलेल्या सर्व सवलती याही वर्षी कायम ठेवण्यात येतील. हा उत्सव साजरा करताना कायद्याचे योग्य पालन करावे. ईद ए मिलाद सणही गणेशोत्सवा दरम्यान येत असल्याने समन्वयाने धार्मिक सौहार्दता ठेवत कुठेही कायदा सुव्यवस्था बिघडणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी. गणेशोत्सवादरम्यान ध्वनिक्षेपकांना दिलेल्या परवानगीचे दिवस वाढविण्यासाठी न्यायालयाच्या अधीन राहून सकारात्मक कार्यवाही करण्यात येईल.

## स्वातंत्र्यदिनी कोणी काय खावे हे सरकार ठरवणार का?

# भाजप आणि स्वातंत्र्यदिनाचा संबंधच काय ? - सपकाळ

### 'कबुतर जिहाद' भाजप सरकारचेच पाप

■ **मुंबई**

स्वातंत्र्य दिन हा राष्ट्रीय सण आहे, स्वातंत्र्य दिन व भारतीय जनता पक्षाचा काहीही संबंध नाही. अख्खा देश स्वातंत्र्यासाठी लढत होता तेव्हा भाजपाचे पूर्वज ब्रिटिशांसोबत होते, काहीजण ब्रिटिशांची पेन्शनही खात होते, इंग्रजांना मदत करत होते. भाजपाच्या पूर्वजांवरचे हे काळे डाग लपवण्यासाठीच स्वातंत्र्यदिनी कोणी काय खायचे याचे फतवे काढले जात आहेत, असा घणाघाती हल्लाबोल महाराष्ट्र काँग्रेसचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे.

टिळक भवन येथे पत्रकार परिषदेत बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी भाजप महायुती सरकारवर सडकून टीका केली. ते पुढे म्हणाले की, वन नेशन वन लिडर संकल्पना आणून एकच नेता, एकच पेहराव, एकच भाषा आणि एकच खाणं करून देशातील विविधतेतील एकता संपवायची आणि हुकूमशाही आणायची हा भाजपचा डाव आहे. हिंदू-मुस्लीम वाद तर दररोजच सुरु आहे. आधी मराठा- ओबीसी वाद घातला त्यानंतर मराठी- हिंदी वाद व आता १५ ऑगस्टला मांसाहार करु नये यासाठी फतवा काढला आहे, जनतेवर सर्वप्रकारे सरकारी नियंत्रण आणण्याचा हा प्रकार आहे.

कबुतरांना जगण्याचा अधिकार आहे तसाच माणसांनाही जगण्याचा अधिकार आहे. कबुतरांचे पंख व विष्ठेपासून फुफ्फुसाचे गंभीर आजार होतात यात शेकडोजणांना जीवही गमवावा लागला आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्नही तेवढाच महत्वाचा आहे, पण भाजप सरकारने जाणीवपूर्वक कबुतर जिहाद सुरु केला आहे. सरकारमधील मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्याकडे मुंबईत भरपूर जमीन आहे. या जमिनीवर लोढा व कंपनीने विशेष कबुतर प्लाझा उभा करावा, असे सपकाळ म्हणाले.

***फडणवीसांनी स्थापन केलेय 'दंगा करो पथक'***
*भाजप महायुती सरकारमध्ये टोळीयुद्ध सुरु आहे, प्रचंड भ्रष्टाचार बोकाळला आहे, राज्य दिवाळखोरीत काढले आहे. तसेच मतचोरीच्या वास्तवापासून जनतेचे लक्ष दुसरीकडे वळवण्यासाठी भाजपा सरकारनेच कबुतरखान्याच्या प्रश्नाला हवा दिली आहे. तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी राज्यात 'दंगा नियंत्रण पथक' स्थापन केले होते. पण सध्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'दंगा करो पथक' स्थापन केले आहे. हे पथक नागपूर, पुणे, नाशिक, मुंबईमध्ये पाठवून सामाजिक शांतता भंग करत आहे. जैन समाजातील महान संत महावीर यांनी विनय, विवेकता, विनम्रता याची शिकवण दिली आहे, त्याचे पालन होताना दिसत नाही.*

**NSUI च्या नवनियुक्त अध्यक्षांचा पदग्रहण सोहळा**

प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या प्रमुख उपस्थितीत NSUI चे नवनियुक्त महाराष्ट्र अध्यक्ष सागर साळुखे यांचा पदग्रहण सोहळा टिळक भवनात पार पडला. मावळते अध्यक्ष आमीर शेख यांनी अध्यक्षपदाची सुत्रे साळुंके यांच्या हाती दिली. या कार्यक्रमाला अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सचिव बी. एम. संदीप, माजी मंत्री डॉ. विश्वजित कदम, NSUI चे राष्ट्रीय अध्यक्ष वरूण चौधरी, माजी अध्यक्ष अमीर शेख, लेनी जाधव, निरंजन टकले हे उपस्थित होते.

## कबुतरखाना बंदी समर्थनार्थ म. ए. समिती आक्रमक
### कार्यकर्त्यांची धरपकड

### जैन समाज आणि मराठी आंदोलनाबाबत पोलिसांकडून दूजाभाव

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

सकाळपासूनच दादर कबुतरखाना परिसरात तणाव होता. तेथे जैन समाज आणि मराठी एकीकरण समितीने आंदोलनाची हाक दिल्याने मोठा राडा होण्याची शक्यता होती. मात्र पोलिसांनी तत्पूर्वीच एकतर्फी कारवाई करीत मराठी एकीकरण समितीच्या पदाधिकारी, कार्यकर्ते यांची धरपकड केली. तसेच, मराठी एकीकरण समितीचे आंदोलन दडपले. त्यामुळे मराठी बांधवांकडून तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे.

दरम्यान, जैन समाजाने जरी आंदोलनाचा इशारा दिला होता तरी पोलिसांनी त्यांना अगोदरच समज दिल्याचे सांगण्यात येते. त्यामुळे काल जैन समाज, त्यांचे मुनी देखील रस्त्यावर उतरले नव्हते. जैन मंदिरही बंद ठेवण्यात आले होते. मात्र मराठी एकीकरण समितीचे नेते सकाळी ११ वाजता कबुतर खाना परिसरात येताच पोलिसांनी त्यांना अटक केली या कारवाईचा सर्वत्र निषेध व्यक्त करण्यात येत आहे.

मुंबई महापालिकेने न्यायालयाच्या आदेशानुसार, कबुतरखान्यांवर आणि कबुतरांना दाणे, खाद्यपदार्थ टाकण्यावर बंदी घातली आहे. मराठी एकीकरण समितीने कबुतरखान्यांवरील पालिकेची कारवाई लोकहिताच्या आणि नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने योग्य असल्याचे सांगत कारवाईच्या समर्थनार्थ १३ ऑगस्ट रोजीच आंदोलन पुकारले. जैन समाज आणि मराठी एकीकरण समिती आमनेसामने आल्यामुळे संघर्ष होण्याची आणि त्यामुळे कायदा व सुव्यवस्था बिघडण्याची शक्यता होती. दादर कबुतरखाना येथे मोठा राडा होण्याची दाट शक्यता होती. त्यामुळे पोलिसांनी अगोदरच फिल्डिंग लावली. मराठी एकीकरण समितीचे पदाधिकारी, कार्यकर्ते कबुतरखाना परिसरात दाखल होताच पोलिसांनी त्यांची नाकाबंदी करून त्यांना चारही बाजूने घेतले आणि त्यांची धरपकड केली.

मात्र जैन समाजाच्या महिलांनी हातात चाकू, सुरे घेऊन यापूर्वी आक्रमक आंदोलन केले होते. महापालिकेने ताडपत्रीने बंदिस्त केलेला कबूतरखाना जैन समाजाच्या लोकांनी चाकू, सुरे घेऊन ताडपत्री फाडून टाकली होती. कबुतरांना दाणे सुद्धा खायला घातले होते. मात्र त्यांच्यावर पालिकेने, पोलिसांनी कोणतीही कायदेशीर कारवाई केली नाही. मात्र मराठी एकीकरण समितीच्या पदाधिकारी, कार्यकर्ते यांची धरपकड करून , मराठी एकीकरण समितीचे आंदोलन दडपून पोलिसांनी एकतर्फी कारवाई केली, असा आरोप मराठी एकीकरण समितीतर्फे करण्यात आला. पोलिसांच्या कारवाईच्या विरोधात तीव्र संताप व्यक्त करण्यात आला.

## मुंबई बँकेच्या माध्यमातून बेस्ट एम्प्लॉईज क्रेडिट सोसायटीला जी मदत लागेल ती करणार

### पत्रकार परिषदेत आमदार प्रविण दरेकरांचे आश्वासन

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

बेस्ट एम्प्लॉईज क्रेडिट सोसायटीशी माझा जवळचा संबंध आहे. २५-३० वर्ष बँकेच्या माध्यमातून या पतसंस्थेला ताकद देणे, मदत करण्याचे काम अविरहितपणे केलेय. या पतसंस्थेला मुंबई जिल्हा बँकेच्या माध्यमातून जी मदत लागेल ती केली जाईल, असे आश्वासन भाजपा गटनेते आणि मुंबई जिल्हा बँकेचे अध्यक्ष आमदार प्रविण दरेकर यांनी दिले.

भाजपा आमदार आणि समृद्धी सहकार पॅनेलचे सर्वेसर्वा प्रसाद लाड यांनी आज बेस्ट एम्प्लॉईज क्रेडिट सोसायटीच्या पंचवार्षिक निवडणुकीसंदर्भात पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते. यावेळी आमदार प्रविण दरेकर बोलत होते. याप्रसंगी दरेकर यांच्या हस्ते समृद्धी सहकार पॅनेलचा जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला.

दरेकर म्हणाले कि, सहकारात खऱ्या अर्थाने समृद्धी आणण्याची गरज आहे. देशाचे सहकार मंत्री अमित शहा यांनी धोरण बनवत असताना 'सहकार से समृद्धी' केले. त्याच धोरणाची पाठराखण करत प्रसाद लाड यांनी पॅनेलला नावही 'सहकार समृद्धी' दिल्याचे दिसते. बेस्ट एम्प्लॉईज क्रेडिट सोसायटीशी माझा जवळचा संबंध आहे. २५-३० वर्ष बँकेच्या माध्यमातून या पतसंस्थेला ताकद देणे, मदत करण्याचे काम अविरहितपणे केले, असे दरेकर म्हणाले.

तसेच दरेकर पुढे म्हणाले कि, ज्यावेळी मुंबईत हौसिंग फेडरेशनची निवडणूक होती त्यावेळी सहकारात सामोपचाराने एकत्रित निवडणुका लढवू असे उबाठा पक्षाला सांगितले होते. परंतु ते ऐकले नाहीत. परिणामी २१ च्या २१ जागा आमच्या निवडून आल्या व उबाठा चा दयनीय असा पराभव झाला. आताही उबाठा व मनसे अशा प्रकारे निवडणूक लढताहेत. त्यांना सभासदांशी देणेघेणे नाही.जिल्हा बँक ही या पतसंस्थेची पालक बँक आहे. या बँकेला लागणारा अर्थपूरवठा करणारी संस्था आम्ही आहोत. अनेक योजना पतसंस्था आणि जिल्हा बँकेच्या माध्यमातून एकत्रितपणे करण्याचा आमचा मानस आहे. पतसंस्थेला ताकद देण्याचे काम आम्ही करू. उद्धव ठाकरे अडीच वर्ष मुख्यमंत्री होते. मात्र त्यांनी कधीच या व्यवस्थेकडे लक्ष दिले नाही. जे बेस्ट कामगारांचे नेतृत्व करत होते त्यांनी फक्त कामगारांना पिळून काढणे एवढेच काम केले, असा आरोपही दरेकर यांनी केला.

***निवडणुकीत पाच पांडवांचे पॅनेल - आ. लाड***
*तत्पूर्वी पत्रकार परिषदेला संबोधित करताना आ. प्रसाद लाड यांनी म्हटले कि, सहकार समृद्धी पॅनेलमध्ये समर्थ बेस्ट कामगार संघटना, बेस्ट राष्ट्रीय कर्मचारी सेना, दि इलेक्ट्रिक युनियन श्रमिक उत्कर्ष सभा, एससी/ एसटी वेल्फेअर असोसिएशन आणि बहुजन एम्प्लॉईज युनियन असे पाच पांडवांचे पॅनेल असून त्या माध्यमातून सहकार समृद्धी पॅनेल उभे केले आहे. हे पॅनेल माझ्या नेतृत्वात निवडणूक लढवेल, असेही लाड म्हणाले.*

## युनियन बँक ऑफ इंडियाचा पॅनेल ॲडव्होकेट्स मेळावा उत्साहात

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

मुंबईतील चर्चगेट येथील द ॲम्बेसेडर हॉटेलमध्ये युनियन बँक ऑफ इंडिया, झोनल ऑफिस मुंबईतर्फे पॅनेल ॲडव्होकेट्स मेळाव्याचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या मेळाव्यात संपूर्ण झोनमधील पॅनेलवर नोंद असलेल्या शंभराहून अधिक वकिलांचा सहभाग होता.

कार्यक्रमाला मुख्य महाव्यवस्थापक (एसएएमव्ही) केंद्रीय कार्यालयाचे श्री रवींद्र बाबू, मुख्य कायदा अधिकारी (एसएएमव्ही) केंद्रीय कार्यालयाचे श्री प्रशांत कुमार मिश्रा, मुंबई झोनचे मुख्य महाव्यवस्थापक श्री बिराजा प्रसाद दास, उप- झोनल प्रमुख श्री के. नटराज तसेच वरिष्ठ अधिकारी आणि प्रादेशिक प्रमुख उपस्थित होते.

मेळाव्यात कर्ज वसुली न्यायाधिकरण (डीआरटी) आणि राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण (एनसीएलटी) यांच्यासमोरील प्रकरणे वेगाने हाताळण्यावर भर देण्यात आला. जलद विवाद निराकरणासाठी एनसीएलएटी बेंच वाढविण्याचे महत्त्वही चर्चेत मांडण्यात आले. बँकेच्या कायदेशीर हितांचे रक्षण आणि वसुली यंत्रणा मजबूत करण्यामध्ये पॅनेल ॲडव्होकेट्सची महत्त्वपूर्ण भूमिका असल्याचे सर्व वक्त्यांनी अधोरेखित केले.

श्री रवींद्र बाबू यांनी वकिलांचे कौतुक करताना ते फक्त कायदेशीर प्रतिनिधी नसून बँकेच्या हितांचे रक्षण करणारे धोरणात्मक भागीदार असल्याचे सांगितले. श्री बी. पी. दास यांनी प्रत्येक व्यवहारात ठोस कायदेशीर मते आणि अचूक शीर्षक शोध अहवालाचे महत्त्व स्पष्ट केले. तर श्री मिश्रा यांनी कार्यक्षम कायदेशीर कारवाईमुळे मजबूत वसुली आणि निरोगी बँकिंग संचालनाला चालना मिळते, असे मत व्यक्त केले.

मेळाव्याचा समारोप झोनल ऑफिसचे महाव्यवस्थापक श्री शलज कुमार सिन्हा यांच्या आभारप्रदर्शनाने झाला. त्यांनी बँकेच्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी वकिलांच्या वचनबद्धतेबद्दल आणि सहकार्याबद्दल विशेष आभार मानले.

## पालिका 3447 कर्मचाऱ्यांचे वेतन रोखणार

**मुंबई:** महानगरपालिकेत एकूण ३४४७ कर्मचारी हे ९९९९९९९ पोझिशनवर वेतन घेत आहेत. ही बाब आर्थिक गैरशिस्तीची व प्रशासकीय निष्काळजीपणाची आहे.एक महिन्यांपेक्षा जास्त कालावधीसाठी ९९९९९९९ पोझिशनवर कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांचे वेतन थांबवण्याचा निर्णय लवकरच घेण्यात येणार आहे. अशा प्रकारे कर्मचाऱ्यांचे वेतन थांबल्यास त्यास संबंधीत प्रशासकीय अधिकारी, खाते प्रमुख व सहायक आयुक्त जबाबदार असतील याची नोंद घ्यावी. याबा[...] काही अडचण असल्यास मा[...] संसाधन विभागास संपर्क करा[...]


**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

**ई निविदा सूचना क्रमांक ३३/२०२५ २०२६ (मुंबई)**

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | सिप्झ...ठेव अंशदान काम... सिप्झ स्टाफ कॉलनी येथील डी - १ बंगल्याची दुरुस्ती व नूतनीकरण करणे. | ₹ ४७,५८,५६४.०० |

उपरोक्त कामाबाबत निविदा प्रपत्र दिनांक १३/०८/२०२५ ते दिनांक २८/०८/२०२५ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी उपरोक्त कामाबाबत दिनांक १८/०८/२०२५ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमुद संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्याचे निराकरण / महामंडळाचा खुलासा दिनांक २१/०८/२०२५ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

जा.क्र./का.अ.(मुख्या)/ P- 526015 / २०२५


## राष्ट्रवादी मुंबई निवडणुकीची सूत्रे नवाब मलिक यांच्या हाती

**मुंबई:** अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसची मुंबईतील सूत्रे माजी अल्पसंख्याक मंत्री नवाब मलिक यांच्याकडे सोपवण्यात आली आहेत. मुंबई महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसने पक्षाची 'मुंबई निवडणूक व्यवस्थापन समिती' स्थापन केली असून त्याच्या अध्यक्षपदी मलिक यांना नेमण्यात आले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या मुंबई अध्यक्षपदाचा समीर भुजबळ यांनी विधानसभा निवडणुकांच्या तोंडावर राजीनामा दिला होता.


**मध्य रेल्वे**
**बांधकाम कामे**

भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने, मुख्य अभियंता (क) आरएसपी, मध्य रेल्वे, जी. एम. इमारत, दुसरा मजला, सीएसएमटी मुंबई-४०० ००१ खालील कामांसाठी ई-प्रापण संकेतस्थळ, "http:// www.ireps.gov.in" वर ई-बोली मागवित आहेत. आहेत. अनुक्रमांक १. निविदा सूचना क्रमांक आणि तारीख: CONS-RSP-04-2025 दिनांक १३.०८.२०२५ कामाचे नाव: मध्य रेल्वेवरील नागपूर विभागात ईटी-एएमएफ विभागावरील किमी ८५६.७८७ वर एलसी क्रमांक-२५९ आणि एनजीपी-एएमएफ विभागावरील किमी १००६/३७-३९ वर एलसी-२८७ च्या बदल्यात आरयूबीसह २ लेन प्रस्तावित दोन रोड ओव्हर ब्रिज (आरओबी) बांधणे. कामाची अंदाजे किंमत रु.: ६१०२७४९२४.६७ बोली सुरक्षा रु.: ३२०१४००.०० पूर्ण कालावधी: २४ महिने काम पूर्ण करण्याची तारीख आणि वेळ:- ०८/०९/२०२५ सकाळी ११:०० वाजता १. वरील ई-निविदा सूचनेची संपूर्ण माहिती "http://www.ireps.gov.in" या वेबसाइटवर उपलब्ध आहे. २. वरील निविदांविरुद्ध ई-बिड्सच्या स्वरूपात असलेल्या निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत. ३. वेळोवेळी जारी केलेले निविदा दस्तऐवज आणि शुद्धिपत्र निविदा उघडण्याच्या किमान १५ दिवस आधी वेबसाइटवर उपलब्ध आहेत आणि सदर संकेतस्थळावर पाहता येतील. 367

अनधिकृतपणे रेल्वे मार्ग ओलांडणे दंडनीय गुन्हा आहे



**जाहीर नोटीस**

माझे अशील श्रीमती. जोहराबी कासम शेख यांनी दिलेल्या माहितीवरून त्यांच्यावतीने जाहीर नोटीस देण्यात येते की माझे अशील खालील नमुद खोली मुळ भाडेकरू श्री. मोहिदीन अब्दुल रेहमान यांच्या नावावरून स्वतःच्या नावे हस्तांतर करीत आहेत. तरी सदरहु मिळकतीबाबत जर कोणा व्यक्तीचा, संस्थेचा, बँकेचा, किंवा अन्य कोणत्याही कंपनीचा दावा, वोजा, हक्क, अधिकार, किंवा हरकत वा आक्षेप असल्यास त्यांनी माझ्या खाली नमुद पत्यावर व मालमत्ता अधिकारी, डी विभाग, यांचे कार्यालय जोबनपुत्र कंपाऊंड, नाना चौक, ग्रँट रोड पश्चिम, मुंबई - ४०० ००७, या पत्यावर आपली हरकत पुढील १४ दिवसाचे आत पुराव्यानिशी सादर करावी. अन्यथा सदरहु दावे माझे अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत, म्हणुन जाहीर नोटीस.

**मिळकतीचा तपशील**

**खोली नं. १०, तळ मजला, ६० टेनामेन्ट, फाल्कलँड रोड, मुंबई, महाराष्ट्र, पिन - ४०० ००४ ही निवासी मालमत्ता.**

दिनांक - १३ ऑगस्ट २०२५

**-/ सही**
**श्री. विनायक जोतिबा फडके,**
**वकील उच्च न्यायालय,**
**कार्यालय नं. ०१, रविकिरण साफल्य बिल्डींग, पहिला मजला,**
**ना. म. जोशी मार्ग,**
**लोअर परेल, करी रोड, मुंबई - ४०००१३,**
**मोबाईल नं. - ९८३३८०७५१५**



**एसपीव्ही ग्लोबल ट्रेडिंग लिमिटेड**
सीआयएन: एल२७१००एमएच१९८५पीएलसी०३५२६८
२८/३०, अनंत वाडी, बिनानी भवन, तळ मजला, भूलेश्वर, मुंबई ४००००२ ई-मेल : spvglobaltrading@gmail.com संकेतस्थळ: www. spvglobal.in

**३० जून २०२५ रोजी संपलेल्या त्रैमासिकासाठी अलेखापरीक्षित वित्तिय निष्कर्षाचा आराखडा**

(रु. लाखामध्ये)

| अनु. क्र. | तपशिल | एकमेव | | | एकत्रिकृत | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संपलेले तिमाही | गेल्या गत वर्षामधील याच कालावधीच्या संपलेले ३ महिने संपलेली तिमाही | संपलेले गत वर्ष | संपलेले तिमाही | गेल्या गत वर्षामधील याच कालावधीच्या संपलेले ३ महिने संपलेली तिमाही | संपलेले गत वर्ष |
| | | ३०.०६.२०२५ | ३०.०६.२०२४ | ३१.०३.२०२५ | ३०.०६.२०२५ | ३०.०६.२०२४ | ३०.०६.२०२५ |
| १ | कार्यामधून एकुण उत्पन्न (निव्वळ) | १.२१ | २७४.१० | २,४०५.५० | २४,६७५.३७ | २२,४६१.९७ | ९१,९९२.३२ |
| २ | सामान्य कार्यामधून कालावधीसाठी निव्वळ नफा/ (तोटा) (कर अपवादात्मक आणि/ किंवा अतिविशिष्ट बाबी पूर्व) | (३५.९५) | (१५.७४) | (२.९३) | ५५७.२३ | १,५५६.५२ | ३,८२४.१३ |
| ३ | कर पूर्व कालावधीसाठी निव्वळ नफा/ (तोटा) (अपवादात्मक आणि/ किंवा अतिविशिष्ट बाबी पूर्व) | (३५.९५) | (१५.७४) | (२.९३) | ५५७.२३ | १,५५६.५२ | ३,८२४.१३ |
| ४ | कर पश्चात कालावधीसाठी निव्वळ नफा/ (तोटा) (अपवादात्मक आणि/ किंवा अतिविशिष्ट बाबी पूर्व) | (२६.८७) | (१५.७४) | (२.१९) | ३९६.४० | १,०७४.७७ | २,६५३.८३ |
| ५ | कालावधीसाठी एकूण सर्वंकष उत्पन्न (एकत्रित नफा/ (तोटा)) | (२६.६६) | (१५.६६) | (२.३४) | ३९७.११ | १,०७४.८४ | २,६११.१५ |
| ६ | सम भाग भांडवल (दर्शनी मूल्य रु. १०/- प्रती समभाग) | १९६.०० | १९६.०० | १९६.०० | १९६.०० | १९६.०० | १९६.०० |
| ७ | राखीव (गत वर्षाच्या लेखापरीक्षित शिलकीच्या ताळेबंदामध्ये नमूद केल्यानुसार (पुनर्मुल्यांकित राखीव वगळता) | | | | - | - | १६,४३६.१४ |
| ८ | प्रती समभाग उत्पन्न (अतिविशिष्ट बाबी नंतर) | | | | | | |
| | (ए) मूळ | (०.८०) | ०.२५* | २.४५ | २७.३०* | (०.०६)* | २५.९५ |
| | (बी) सौम्यीकृत | (०.८०) | ०.२५* | २.४५ | २७.३०* | (०.०६)* | २५.९५ |

१. वरील अलिखित आर्थिक परिणामांचे पुनरावलोकन ऑडिट समितीने केले आहे आणि शिफारस केली आहे आणि १२ ऑगस्ट २०२५ रोजी झालेल्या बैठकीत मंडळाने मंजूर केले आहे. वैधानिक लेखापरीक्षकांनी वरील निकालांचे मर्यादित पुनरावलोकन केले आहे. एक अपात्र मत जारी केले आहे. त्यावर त्यांच्याद्वारे ३० जून २०२५ रोजी संपलेल्या तिमाही आणि वर्षाच्या आर्थिक निकालाचे संपूर्ण स्वरूप www.bseindia.com आणि www.spvglobal.in वर उपलब्ध आहे.

ठिकाण: मुंबई
दिनांकित: १३.०८.२०२५

एसपीव्ही ग्लोबल ट्रेडिंग लिमिटेड करीता
सही/-
बाळकृष्ण बिनानी
व्यवस्थापकीय संचालक
डीआयएन: ००१७५०८०